महाराष्ट्र राज्यातील भटक्या जमाती- ब प्रवर्गाच्या यादीतील अनुक्रमांक २५ वर नोंद करण्यात आलेल्या भोई जमातीची तत्सम जाती म्हणून उप क्रमांक -८ वर नमूद किरात या जमाती ऐवजी "किरात/किराड" अशी नोंद कायम ठेवणेबाबत

महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग सामाजिक शैक्षणिक मागास प्रवर्ग,
विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग
शासन निर्णय क्रमांक. बैठक-२०१८/प्र.क्र.४७/मावक
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०१ ऑगस्ट, २०१९

वाचा:- १) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन पत्र क्र.संकिर्ण-२००८/यादी/ प्र.क्र.५५३/मावक-५, दिनांक २६ सप्टेंबर,२००८.
२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन शुध्दीपत्र क्र.सीबीसी-१०/२०१२ /प्र.क्र.३८/मावक, दिनांक ०६ मार्च,२०१३
३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन शुध्दीपत्र क्र.सीबीसी-१०/२०१२ /प्र.क्र.३८/मावक, दिनांक २७ फेब्रुवारी, २०१३.
४) राज्य मागासवर्ग आयोग, पुणे याचा अहवाल क्र.१,११ व २१ मधील शिफारशी
५) राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांनी शासनास सादर केलेल्या प्रकरण क्रमांक १३६/९५ व ५२/२००५ मधील शिफारशी
६) मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे दाखल याचिका क्रमांक ७४७५/ २०१८ ,७०६८/ २०१८, ७६५२/२०१८ व ८६४८/२०१८

प्रस्तावना:-

महाराष्ट्र राज्याच्या भटक्या जमाती-ब प्रवर्गाच्या यादीतील अ.क. २५ वर नोंद करण्यात आलेल्या भोई जमातीच्या तत्सम जाती म्हणून उप क्रमांक -८ वर नमूद किरात या जमातीऐवजी "किरात/किराड" अशी सुधारणा करण्यासाठी निर्गमित करण्यात आलेल्या दिनांक ०६.०३.२०१३ व दि.२७.०२.२०१३ रोजीचे शासन शुध्दीपत्रक तसेच याबाबत राज्य मागासवर्ग आयोग पुणे यानी शासनास सादर केलेल्या शिफारशीबाबत दिनांक ३० जुलै,२०१९ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ उपसमितीची बेठक आयोजित करण्यात आली होती.

२. महाराष्ट्र राज्याच्या भटक्या जमाती-ब प्रवर्गाच्या यादीतील अ.क्र. २५ वर नोंद करण्यात आलेल्या भोई जमातीच्या तत्सम जाती म्हणून उप क्रमांक- ८ वर नमूद किरात या जमातीऐवजी "किरात/किराड" अशी सुधारणा करण्यासाठी निर्गमित करण्यात आलेल्या दि.०६.०३.२०१३ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकाबाबत तसेच याबाबत राज्य मागासवर्ग आयोग पुणे यांनी शासनास सादर केलेल्या अहवालातील शिफारसी आयोगाकडे फेरविचारार्थ पाठवावे किंवा कसे, याबाबतचा प्रस्ताव विभागाने उप समितीच्या निर्णयार्थ उक्त नमूद दि.३०.७.२०१९ रोजीच्या बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली गठीत मा.मंत्रीमंडळ उपसमितीसमोर ठेवला होता. सदर बैठकीत मा.मंत्रीमंडळ उपसमितीने खालीलप्रमाणे निर्णय घेतला.

३. किरात / किराड या जमातीसंदर्भात सामाजिक न्याय विभागाकडून दि.०६.०३.२०१३ व दि.२७.०२.२०१३ रोजीची दोन शुध्दीपत्रके निर्गमित झाली असून दोन्ही शुध्दीपत्रकांमध्ये अंतर्भूत बाब समान आहे. परंतू ही दोन्ही शुध्दीपत्रके निर्गमित करण्यापूर्वी राज्य मागासवर्ग आयोगाकडून प्राप्त झालेल्या अहवालातील शिफारशी मा.मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीत निर्णयासाठी ठेवून उप समितीच्या निर्णयानुसार शुध्दीपत्रक निर्गमित करण्याची कार्यवाही करणे अपेक्षित होते. परंतू अशी कार्यवाही झालेली नाही. राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांनी प्रकरण क्र. १३६/९५ तसेच प्र.क्र.५२/ २००५ अन्वये किराड ही जात भटक्या जमातीचे निकष पूर्ण करत नसल्यामुळे या जातीचा समावेश भटक्या जमातीमध्ये करण्यात येवू नये अशी शिफारस शासनास केली होती. परंतू आयोगाची ही शिफारस सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने वेळीच मंत्रीमंडळ उप समितीच्या निदर्शनास आणली नाही. त्यामुळे निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकांबाबत संभ्रम निर्माण होऊन न्यायोचित निर्णय घेण्याची परिस्थिती निर्माण झाली.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ०६ मार्च,२०१३ रोजीच्या शुध्दीपत्रकानूसार सन २०१३ पासून महाराष्ट्र राज्यातील किराड जमातीच्या व्यक्तींना जात प्रमाणपत्र देण्यात देण्यात येत आहेत.या जात प्रमाणपत्राच्या आधारे या जमातीचे लोक शैक्षणिक, आर्थिक सुविधांचा लाभ घेत आहेत ही बाब विचारात घेऊन भारतीय संस्कृती कोषामध्ये निदर्शनास येत असलेल्या किराड जातीचा उल्लेख व त्यामध्ये किरात व किराड या दोन्ही जाती एकच असल्याबाबत करण्यात आलेला उल्लेख, केंद्र शासनाच्या दिनांक २३.४.१९४२ रोजीच्या निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ मधील अ.क्र. ११४ वर करण्यात आलेला किराड जातीचा उल्लेख तसेच महाराष्ट्रीय ज्ञानकोषामध्ये देखील किरार-किराड ही शेतकरी जात असल्याने स्पष्ट करुन किरार व किरात हे एकच असल्याबाबत व्यक्त करण्यात आलेले मत या सर्व बाबीचा विचार करुन किराड या जातीसंदर्भात राज्य मागासवर्ग आयोगाने शासनास केलेली शिफारस अमान्य करुन महाराष्ट्र राज्याच्या भटक्या जमाती-ब प्रवर्गाच्या यादीतील अ.क्र.२५ वर नोंद करण्यात आलेल्या भोई जमातीच्या तत्सम जाती म्हणून उप क्रमांक-८ वर नमूद किरात या जमाती ऐवजी “किरात/किराड” अशी सुधारणा करण्यासाठी निर्गमित करण्यात आलेल्या वाचा येथील संदर्भाधीन क्र.२ च्या शुध्दीपत्रकातील तरतूदी कायम ठेवण्याबाबतचा शासन निर्णय त्वरित निर्गमित करण्याचा निर्णय मंत्रीमंडळ उपसमितीने सदर बैठकीत घेतला. त्याचप्रमाणे मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे सदर प्रकरणी प्रलंबित याचिकांमध्ये किराड जातीबाबत मंत्रीमंडळ उपसमितीचा निर्णय मा.उच्च न्यायालयाच्या निर्दशनास आणून द्यावा असाही निर्णय मा.मंत्रीमंडळ उपसमितीने घेतला. त्यानुसार “किरात/किराड” या उपजातीबाबत पुढील प्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या यादीमधील महाराष्ट्रातील भटक्या जमाती- ब मधील क्र.२५ “भोई” जातीसमोरील अ.क्र. ८ वर नमूद “किरात” ऐवजी “किरात/किराड” अशी दुरुस्ती करण्यासंदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वाचा क्र.०२ येथे नमूद दि.०६.०३.२०१३ रोजीचे शुध्दीपत्रक तसेच वाचा क्र.०३ येथे नमूद दि.२७ फेब्रुवारी २०१३ रोजीचे शासन शुध्दीपत्रक रद्द करुन खालील प्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

०२. वाचा क्र.०२ व ०३ येथे नमूद शासन शुध्दीपत्रकातील सुधारणांनुसार भटक्या जमाती-ब प्रवर्गातील अ.क्र. २५ वर नोंद असलेल्या "भोई" या जमातीची अ.क्र.८ येथे नमूद उपजात असलेल्या "किरात/किराड "या उपजातीची नोंद कायम ठेवण्यात येत आहे.

०३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०११६५७२५४२२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानूसार व नावाने.

RAVINDRA VASANTRAO GURAV

Digitally signed by RAVINDRA VASANTRAO GURAV
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=0030b22364370f4d96ab251b7263219586c0069b661c3f9cd6fd67e55000ce92, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=9dfb7aefbd9e82b129c324d567b46e1d853d93c38d6e222c868eac72ecd12784, ou=VJNT OBC AND SBC DEPT, o=GOVERNEMENT OF MAHARASHTRA, cn=RAVINDRA VASANTRAO GURAV
Date: 2019.08.03 15:27:31 +05'30'

(रविंद्र गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल महोदयांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अ.मु.स/प्र.स.सचिव.
३. मा.मंत्री व राज्यमंत्री (सर्व) महाराष्ट्र राज्य.
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद
६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
७. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई
८. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१०.मुख्य महानगर दंडाधिकारी
११.सर्व विभागीय आयुक्त
१२.सर्व जिल्हादंडाधिकारी
१३.सर्व उपविभागीय अधिकारी (महसूल) तथा उपविभागीय दंडाधिकारी
१४.सर्व तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार
१५.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, मुंबई
१६.प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
१७.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, खंडपीठ, नागपूर
१८.प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा,खंडपीठ, नागपूर
१९. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, खंडपीठ, औरंगाबाद
२०. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, खंडपीठ, औरंगाबाद
२१.संचालक,समाज कल्याण/विजाभज, महाराष्ट्र राज्य, पुणे
२२.संचालक, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुबई

२३.संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२४.संचालक, प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२५.संचालक, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक
२६.संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
२७.सदस्य सचिव, राज्य मागावर्ग आयोग, पुणे
२८.सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.

त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख यांना याबाबतच्या सूचना द्याव्यात.

२९.उपायुक्त तथा सदस्य, विभागीय जात पडताळणी समिती (सर्व जिल्हे)
३०.सदस्य सचिव, जिल्हास्तरीय जात पडताळणी समिती (सर्व जिल्हे)
३१.सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी/ सर्वजिल्हा समाज कल्याण अधिकारी
३२.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
३३.सर्व जिल्हा परिषदांचे समाज कल्याण अधिकारी
३४. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, बृहन्मुंबई/मुंबई उपनगरे
३५.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
३६. निवड नस्ती.